नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २५/०२/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## खून

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०४ कि. मी अंतरावर मौजा वार्ड क्र ०२ दहेगाव ता कळमेश्वर जि. नागपुर येथील मयताचे घरी घराजवळील विहीरीमध्ये दिनांक २५/०२/२०२२ चे ०२:२९ वा. सुमारास **कार्तीक बबन नितनवरे (मृतक), वय २५ वर्षे, रा. दहेगाव** हा आरोपी क्र. १) मंगेश मोंढे याची चुलत बहिणी सोबत बोलत होता. असे आरोपी क्र. १. याला वाटत असल्याचे कारणावरून फिर्यादीचे गावातील १) मंगेश दिलीप मोंढे वय २९ वर्ष, २) विक्की शंकर राउत वय २९ वर्ष, ३) अमोल उमाजी चिखले वय २४ वर्ष, ४) हर्षल दिलीप धोटे वय २४ वर्ष, सर्व रा. देहेगाव यांनी दि २४/०२/२०२२ रोजी दुपारी ०२.३० वा. सुमारास एकत्र फिर्यादीचे राहते घरी येवुन आरोपी क्र. १ मंगेश मोंढे याने फिर्यादीस मला कार्तिकला मारायचे आहे, असे बोलुन आरोपी मंगेश याने बाजुला पडलेला बांबुचा दांडा उचलला व फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीचा मुलगा कार्तिक याला अश्लिल शिवीगाळ करून 'तु जास्त माजला का' असे बालुन बांबुच्या दांडयाने मारहाण केली. तसेच फिर्यादी व फिर्यादीचे पत्नीला ढकलढुकल करून फिर्यादीचा मुलगा कार्तिक हा त्याचा जिव वाचविण्यासाठी घरातुन बाहेर पळुन जात असतांना वरील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे मुलाचे मागे पळत जावुन वरील सर्व आरोपी लोकांनी फिर्यादीचा मुलगा कार्तिक यास फिर्यादीचे घराजवळील पाणी असलेल्या विहीरीजवळ पकडुन त्यास ठार मारण्याचे उददेशाने धक्का देवुन विहीरीमध्ये ढकलुन देवुन ठार मारले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बबन रामाजी नितनवरे वय ५७ वर्षे, रा. वार्ड क्र ०२ दहेगाव पो फेटरी ता कळमेश्वर जि नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३०२,४५२,३२४,३२३,२९४,५०४, ५०६ ३४ भादवी सहकलम ३(२)५)३(२)(५अ) अनुसुचित जाती/अनुसुचीत जमाती अत्याचार प्रतिबंधक अधि. १९८९. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास श्रीमती पुजा गायकवाड उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर अतिरीक्त चार्ज सावनेर विभाग सावनेर या करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील टेक इंटेरिओ प्रा.लि. कंपनी पोही शिवार येथे दिनांक २२/०२/२२ चे १९.०० वा. ते २४/२/२२ चे ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिषेक भिमलइदास केसवानी, वय ३८ वर्ष, रा. कमाल चौक, नागपूर यांचे टैक इंटेरिओ प्रा.लि. कंपनीचे अज्ञात आरोपीने मागिल लोखंडी शटर वर करुन कंपनीच्या आत प्रवेश केला. यानंतर आरोपीने कॉम्प्रेशर मशिनचे इलेक्ट्रीक मोटार कि. २५,०००/–रु. ची चोरुन नेले व कॉम्प्रशर मशिनचे स्टेपलायजर कि. १५,०००/–रु. चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८०, ४५७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दयाराम करपाते मो.नं. ९९६०६८२४७८ हे करीत आहे.

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ कि.मी. अंतरावरील एचडीएफसी बॅक समोर काटोल येथे दिनांक २४/०२/२२ चे ११.१५ वा. ते ११.२५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— मनोज कन्हैयालाल हरजाल, वय ५६ वर्ष, रा. शारदा यांनी आरडी चे पैसे २५,३६५/—रू. बॅक मधुन काढुन पीशवी सायकल चे हॅन्डल ला लटकवुन एचडीएफसी बॅक समोर आपली सायकल उभी करून नाष्ता घेण्याकरीता गेले असता अज्ञात आरोपीने फिर्यादीचे सायकल वरील पैश्याची पीशवी चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार जवाहर चव्हान मो. क्र. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**